सारांश [ Synopsis ]

## समारोप

६.१ प्रस्तावना

६.२ कार्यवाही

६.३ निष्कर्ष

६.४ प्रकरणीकरण

६.५ समारोप.

# सारांश [ Synopsis ]

## प्रस्तावना :-

शिक्षणाच्या प्रक्रियेत शिक्षकाला सर्वांगाने महत्वाची आणि कृतिशील भूमिका बजावावी लागते. शिक्षकाला अनेक कार्ये करावी लागतात. तरी अध्यापन हेच त्याचे प्रमुख कार्य आहे. व याच कार्यावरून त्याला अध्यापक हे नांव प्राप्त झाले.

अध्यापनाच्या अनेक प्रकारच्या व्याख्या केल्या गेल्या तथापी बी. ओ. स्मिथ [ १९८४ ] यांनी या व्याख्यांचे ४ प्रकारांमध्ये वर्गीकरण केले आहे ते म्हणजे १] वर्णनात्मक व्याख्या, २] परिणामकारकाधिष्ठित व्याख्या, ३] हेतू / उद्दिष्ठाधिष्ठित व्याख्या, ४] आदर्शी व्याख्या.

वर्णणात्मक व्याख्यांमध्ये शिक्षक जेव्हा "अध्यापन" करतो तेव्हा ज्या ज्या कृति त्या कृतिंवर भर दिलेला असतो.

परिणामकारकाधिष्ठित व्याख्यांमध्ये शिक्षकांच्या ज्या कृतिंमुळे प्रत्यक्ष अध्ययन घडते त्याच कृतिंचा अध्यापनांत समावेश केला जातो.

हेतू नुसारी व्याख्येत अध्यापना साठी आवश्यक असणा-या "नैतिक--अटी" च्या पूर्तीस प्राधान्य देतात. या व्याख्येनुसार अध्यापन म्हणजे अभिसंधान, दहशतवाद, प्रचार किंवा मतांत: प्रवेशन [ Indoctrination.] नव्हे.

या व्याख्यांनुसार प्रशिक्षण हे अध्यापनाचा भाग होऊ शकेल.

वरील व्याख्यांवरून हे लक्षांत येईल की अध्यापनांत "पूर्व क्रियात्मक" व आंतर क्रियात्मक अशा दोन अवस्था आहेत. या दोन्ही अवस्थांमध्ये शिक्षक विविध प्रकारचे निर्णय घेत असतो. पाठाचे नियोजन करताना जे निर्णय शिक्षक घेत असतो त्याला "पूर्व क्रियात्मक" निर्णय म्हणतात. या उलट अध्यापन चालू असतांना वर्गातील परिस्थिती नुसार जे निर्णय घ्यावे लागतात त्यांना "आंतर क्रियात्मक" निर्णय म्हणतात. या दोन्ही प्रकारच्या निर्णयांचा अध्यापनावर परिणाम होतो.

त्यामुळे जर शिक्षकाचे वर्गातील प्रत्यक्ष बदलावयाचे असेल तर त्याचे पूर्व क्रियात्मक व आंतर क्रियात्मक निर्णय घेण्याचे वर्तन . बदलावे लागेल. सध्याच्या अध्यापक प्रशिक्षण प्रक्रिये मध्ये पारंपारिकता दिसून येते. ह्या साचेबंद पध्दती मध्ये हर्बार्टची पंचपदी व ब्लूम ची मूल्यमापन पध्दती यांचे मिश्रण आढळते. त्यामध्ये १] व्याख्यान, २] दिग्दर्शन पाठ, ३] पाठ टाचण तयार करणे, ४] प्रत्यक्ष सराव पाठ, ५] प्रत्याभरण या पाच पाय-या येतात.

या मध्ये नविन तंत्राची उल्लेखनीय भर १९७० साली सूक्ष्म अध्यापन ह्याची होय.

सूक्ष्म अध्यापन या तंत्रामध्ये देखिल बाहय वर्तनावर भर असतो. शॉव्हेल सन [ १९७३ ] यांच्या मते तर, बाहय अध्यापन कौशल्ये ही मूलभूत कौशल्ये नसून अध्यापन हेच शिक्षकाचे मूलभूत कौशल्य आहे. आणि या मूलभूत कौशल्यामध्ये फारसे बदल न झाल्यामुळे शिक्षक प्रशिक्षामुळे विद्यार्थी-शिक्षकांच्या अध्यापनांत झालेली सुधारणा ही तात्पुरती होते. परंतु प्रत्यक्ष शाळेमध्ये अध्यापनास गेल्या नंतर या पध्दतीनुसारच विद्यार्थी शिकवितील याची खात्री देता येत नाही. या साठी शिक्षक प्रशिक्षणाच्या काळांत शिक्षकांच्या "विचार प्रक्रिया" व "निर्णय कृति" यावर भर दिला पाहिजे.

विचार प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी " कृतिपूर्व " आणि "आंतरक्रियात्मक " विचार यांचा एकमेकांवर कसा प्रभाव पडतो हे क्लार्क व पीटरसन [ १९७८ ] यांनी आपल्या " विचार प्रक्रिया आणि कृति " या प्रतिमानावरुन दाखवून दिला आहे. या प्रतिमानाची सविस्तर माहिती प्रकरण १ मध्ये आलेली आहे. या दोन्ही क्षेत्रांचा प्रभाव शिक्षक अध्यापनावर असतो म्हणून शिक्षकाने नियोजन करणे आवश्यक आहे. नियोजनाचे अनेक वेगवेगळे भाग असले तरी येथे " पाठ नियोजन " हे अभिप्रेत आहे.

शिक्षक नियोजनाचे महत्व :-

शिक्षक नियोजन म्हणजे पाठनियोजन यामध्ये दोन हेतू साध्य होतात. १] कोणत्यावेळी कोणत्या कृति करावयाच्या त्याचा कागदावर आराखडा तयार करणे, २] दुसरा भाग म्हणजे मानसिक आराखडा तयार होणे. त्या मानसिक आराखडा किंवा प्रतिमा शिक्षकाला अध्यापनांत मदत करतात. व हळूहळू तो अंगवळवणी पडतो. अंगवळवणी पडलेले नियोजन वर्गात सुरु झाले की वैशिष्टयपूर्ण रित्या घडले जाते.

कागदावरचा टाचण लेखना पेक्षा सुस्पष्ट मानसिक आराखडा किंवा प्रतिमा निर्माण होणे हे महत्वाचे आहे. परंतु पारंपारिक प्रशिक्षण पध्दतीत बाहय वर्तनावर भर दिला जातो. शिवाय पाठ नियोजनाची कृति ही रेषीय प्रतिमाना नुसारच होणे आवश्यक आहे. असा आग्रह धरला जातो.

पाठ नियोजन करताना विद्यार्थी-शिक्षक याच पध्दतीचा अवलंब करतात की नाही या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित झाल्याने त्यांचा विचार करावाच लागतो. ते प्रश्न पुढील प्रमाणे होत.

१] हे प्रतिमान त्यांनी स्वत:हून स्विकारलेले असते की त्याच्या-वर लादले गेलेले असते.

२] पाठ नियोजन करीत असतांना विद्यार्थी-शिक्षकांची विचार प्रक्रिया ही रेषीय प्रतिमानाने दिलेल्या विचार प्रक्रियेप्रमाणे चालते कां ? की अन्य रितीने ?

३] जर ते रेषीय प्रतिमानाची विचार-प्रक्रिया अवलंबित नसतील तर ते कोणत्या प्रकारची विचार प्रक्रिया अवलंबितात ?

अशा सारख्या अनेक प्रश्नांचा शोध घ्यावयाचा असेल तर बोधात्मक मानसशास्त्राच्या प्रभावामुळे अशा अभ्यासासाठी कांही पध्दती उपलब्ध झालेल्या आहेत. उदा. १] प्रकट विचार, २] उद्दिपित प्रत्यावहन, ३] धोरण-ग्रहण शक्ति ४] पत्रिका पालन व ५] संचय जाल तंत्र.

प्रस्तुत संशोधनासाठी प्रकट विचार व पत्रिका या पध्दती अधिक उपयुक्त वाटल्याने त्यांचा वापर केला आहे. संशोधना साठी पुढील समस्या निवडली आहे.

<u>समस्येचे विधान</u> :-

" पाठ नियोजन करीत असतांना विद्यार्थी-शिक्षकांमध्ये चालू असणा-या विचार प्रक्रियांचा शोध ".

<u>संशोधन विषयाचे महत्व</u> :-

अध्यापक प्रशिक्षणाच्या कालावधी मध्ये विद्यार्थी-शिक्षकाला २० सराव पाठ घ्यावे लागतात व प्रत्येक सराव पाठा पूर्वी पाठ नियोजन करावे

लागते. ते त्यांना हर्बार्ट च्या पंचपदी प्रमाणे करणेस शिकवितात. या पारंपारीक पध्दती मध्ये विद्यार्थी-शिक्षकांच्या अंतर्गत चालणा-या विचार-प्रक्रियांचा विचारच केला जात नाही. अंतर्गत विचार प्रक्रियांच्या द्वारे अध्यापन प्रक्रियेवर परिणाम होतो म्हणून त्या योगे परिणाम कारकता वाढविता येईल. शिक्षक प्रशिक्षणाची प्रक्रिया अधिक परिणाम कारक करता येईल.

## समस्येची व्याप्ती व मर्यादा :-

मूलत: हे संशोधन विद्यार्थी-शिक्षकांशी संबंधित असल्याने शिक्षक-प्रशिक्षणाच्या सर्व स्तरांवरील विद्यार्थी-शिक्षकांचा समावेश होऊ शकतो. तथापि सोयीसाठी हे संशोधन केवळ १९९०-९१ साला तील " कै. बाळासाहेब खराडे शिक्षण शास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर " या महाविद्यालयातील १५ विद्यार्थ्यांपुरते मर्यादीत ठेवले आहे. त्यासाठी खालील उद्दिष्टे ठरविली आहेत.

## संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे :-

१] पाठ नियोजनांत व्यस्त असणा-या विद्यार्थी-शिक्षकांच्या विचार प्रक्रियांचा शोध घेणे.

२] विद्यार्थी-शिक्षकांच्या विचारांचा अनुक्रम निश्चित करणे.

३] एक रेषीय प्रतिमान व विद्यार्थी-शिक्षकांच्या विचारांचा क्रम.

४] पाठ नियोजनातील विचार प्रक्रिया व वर्तन यांचा तौलनिक अभ्यास.

५] संशोधन निष्कर्षाचे पाठ नियोजनाच्या दृष्टीने महत्व निश्चित करणे.

परिकल्पना :-

प्रस्तुत संशोधन हे शोधक स्वरूपाचे असल्याने कोणतीही परिकल्पना पडताळून पाहिली जाणार नाही.

कार्यवाही :- पथ दर्शक प्रकल्प

प्रस्तुत अभ्यासासाठी पथ दर्शक प्रकल्पाची आवश्यकता असल्याने ४ छोटे छोटे पथ दर्शक प्रकल्प राबविले जातील. व त्यातून मुख्य संशोधना साठी साधने उपलब्ध होतील यांचा वापर मुख्य संशोधनासाठी केला जाईल.

मुख्य संशोधन :-

या साठी कै. बाळासाहेब खराडे शिक्षक शास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या पूर्व परवानगीने १५ इच्छुक विद्यार्थ्यांची विषया नुसार निवड केली. त्यांचे प्रकट विचार या नविन तंत्रा विषयी उद्‌बोधन केले व त्याचे पाठ लागतात त्यांचे प्रथम पाठ नियोजन विषयक विचार ध्वनि मुद्रीत केले व हे ध्वनिमुद्रीत प्रकट विचार कागदावर उतरवून घेऊन ध्वनिमुद्रीत केले. व त्यांचे चिन्हांकीनी करण केले. व त्यावरून विचार प्रवाह तक्ता तयार केला. त्यावरून संशोधनातून जमा झालेल्या सामुग्रीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन करून निष्कर्ष काढले.

या संशोधनातून खालील निष्कर्ष निघाले.

निष्कर्ष :-

१] पाठ नियोजन करीत असतांना विद्यार्थी शिक्षकांची विचार प्रक्रिया एक रेषीय प्रतिमाना नुसार नसते. तेव्हा ती आपण बदलू शकत नाही म्हणून त्यांच्या नैसर्गिक विचार प्रक्रियेच्या अनुरोधाने पाठ नियोजन, टाचण लेखन व्हावे.

२]    परिणाम कारक शिक्षकांचे पाठ नियोजन ही उच्च दर्जाचे असते व त्यांच्या विचारांच्या प्रवाहाची चक्रे पूर्ण व दीर्घ स्वरूपाची असतात. म्हणून त्यांच्या विचार प्रक्रियेला वळण देणे आवश्यक आहे.

३]    सर्वच विद्यार्थी- शिक्षक सर्व विचार घटकांचा विचार करतात असे दिसून येत नाही त्यामुळे पाठ नियोजन करताना त्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

[redacted]

## संदर्भ सूची


कुंडले म. बा. [ १९९० ] " शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाज शास्त्र " महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळासाठी श्री. विद्या प्रकाशन पुण.

जोशी अ. न. [ १९८५ ] " अध्यापनाची प्रतिमने " शिक्षणशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

दामले कुसुम [ १९९१ ] " प्रायोगिक मानसशासत्र " महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळासाठी, साहित्य निर्मिती केंद्र, नागपूर.

दांडेकर वा. ना. [ १९८१ ] " शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र" मोघे प्रकाशन कोल्हापूर.

दांडेकर वा. ना. [ १९८५ ] " शैक्षणिक मूल्यमापन व संख्या शास्त्र " श्री. विद्या प्रकाशन पुणे.

पाटील बा. दा. [ १९८९ ] " पाठ टाचण कार्यवाही प्रशिक्षणा नंतर दिलेल्या पाठ नियोजन प्रशिक्षणाचा शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापनावरील परिणामांचा अभ्यास " अप्रकाशित शोध प्रबंध [ एम्. फिल ] शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

पाटील तु. म. [ १९९२ ] " प्रकट मौखिक शब्दांकनाच्या काळातील विद्यार्थ्यांच्या अशाब्दिक वर्तनाचा त्यांच्या अध्यापनाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास " अप्रकाशित शोध प्रबंध [ एम्. फिल] शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

पुजारी स. य. [ १९९२ ] " शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील सराव अध्यापनातील पाठ मार्गदर्शन देण्याच्या पध्दतींचा चिकित्सक अभ्यास". अप्रकाशित शोध प्रबंध [एम्. फील] शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

बापट भा. गो. [ १९८६ ] " शैक्षणिक संशोधन ", नूतन प्रकाशन, पुणे.

मस्के टी. ए. [ १९८८ ] " शैक्षणिक संख्या शास्त्र " प्रज्ञा प्रकाशन, पुणे.

मुळे आणि उमाठे [ १९७७ ] " शैक्षणिक संशोधनासाठी मूलतत्वे". महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.

सुरवसे म. पं. [ १९९० ] " नियोजन व कार्यवाही क्षमतेमध्ये प्रभुत्व पातळीसाठी दिलेल्या प्रशिक्षणाचा विद्यार्थी शिक्षकाच्या अध्यापनावरील परिणामांचा अभ्यास. " अप्रकाशित शोध प्रबंध [ एम्. फिल ].

Spare N.R.

Effect of Mastery over the Theory and and planning skills on the performance of some teaching skills of the Teacher trainees. Doctorial Dessertation.

## REFERENCES

Anderson, R.C. and Faust, G.W. (1973), Educational Psychology : The Science of Instruction and Learning. Harper and Row Publishere, New York.

Buch M.B. (1987) Ed., Third Survey of Research in Education 1978-1983, National Council of Educational Reserch & Training Publication dept. New Delhi.

Clark, C.M.and Peterson, P.L. (1986), Teachers Thought Processes. In Wittrock (Ed.) Handbook of Research on Teaching (Third Ed.), Macmillan Publishing Company, New York.

Dececco, J.B. (1968), The Psychology of Learning and Instruction : Educational Psychology. A Basic Teaching Model. Prentic-Hall of India Private Limited, New Delhi (1970), pp. 5-28.

Gagne, R.M. (1976), The Learning Basis of Teaching Methods, In N.L. Gage (Ed.), The Psychology of Teaching Methods. The seventy fifth year book of the National Society for the Study of Education, Chicago, pp. 21-43.

Garrett H.E. (1961), Statistics In Psychology and Education, Vakils, FeFFer and Simons Ltd., Bombay.

Husen T. (1988/85), Ed. The International Encyclopedia of Education Pergamon Prass plc, Headington Hill Hall, Oxford OX3 OBW England.

Joshi, A.N. (1984), A Study of Developing Performance, Criteria and Tasting their Dfficacy in Training Student-Teachers in a Teaching Skill-cluster, unpublished Doctoral Dissertation, University of Poona.

Joyce, B. and Weil, M. (1980), Models of Teaching (Second Edition), Prentice Hall, Inc., Englewood Cliffs, New Jersey, pp. 9-10.

Lanier, J.E.and Little, J.W. (1986), Research on Teacher Education. In M.C. Wittrock (Ed.) Hand Book of Reserch on Teaching (Third Edition), Macmillan Publishing Company, New York.

Mitzel H.E. (1982), rd, Encyclopedia of Educational Research 5th Ed., The Free Press, A Division of Macmillan Publishing Co., Inc, New York, Collier Macmillan Publishers, London.

Shulman, L.S. (1986), Paradigms and Research Programs in The Study of Teaching: A Contemporary Perspective, In Wittrock, M.C. Handbook of Research on Teaching, Macmillan Publishing Company, Inc., New York, pp. 24-25.

Sulamia & Mehrotra (1974), Elemenb of Educational Research. Allied Publishers Drivet Ltd., Bombay.

Wittrock, M.C. (1986) Handbook of Research on Teaching (Third--Edition), Macmillan Publishing Company, New York.

Spare N.R. (1992) " Effect of Mastery over the Theary and planning skills on the performance of some teaching skills of the Teacher Trainees " unpublished Doctoral Dissertation, Shivaji University, Kolhapur.